।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade
Phone : (02462) 229574
Extension.No.143, 153
**POST GRADUATION SECTION**
Website: www.srtmun.ac.in
E-mail: dr.pg.srtmun@gmail.com

संदर्भ:पदव्युत्तर/संशोधक मार्गदर्शक/२०२०–२१/४०२१ दि. ०२/०७/२०२०

## परिपत्रक

**विषय: संशोधक मार्गदर्शक मान्यते बाबत.**
**संदर्भ: मा. विद्याा परिषद बैठक क्रं. ३४/४७–२०२०**

मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम नाही अशा महाविद्यालयातील शिक्षकांना संशोधक मार्गदर्शक म्हणुन मान्यता देण्या बाबत दि. २४/०१/२०२० रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील विषय क्रं. ०९/४६–२०२० नुसार निर्णय कायम ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. सबब या पुढे संशोधक मार्गदर्शक मान्यतेसाठी प्रस्ताव खालील प्रमाणे सादर करण्यात यावा, ही विनंती.

१. ज्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम नाही अशा महाविद्यालयातील शिक्षकांनी ज्या महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासह संशोधन केंद्र आहे अशा महाविद्यालयातुन विद्यापीठाकडे संशोधक मार्गदर्शकाचा अर्ज करावा. त्यानुसार संशोधक मार्गदर्शक म्हणुन विद्यापीठाच्या प्रचलित नियमाप्रामणे मान्यता देण्यात येईल.

२. संशोधक मार्गदर्शकास एकाच संशोधन केंद्राशी संलग्नित रहाता येईल. विद्यापीठाच्या पुर्व परवानगी शिवाय संशोधन केंद्र परिवर्तीत करता येणार नाही व त्या संशोधन मार्गदर्शकाचे सर्व विद्यार्थी त्या एकाच केंद्रास संलग्नित राहतील.

३. ज्या शिक्षकांना पुर्वीच संशोधक मार्गदर्शक म्हणुन मान्यता प्रदान करण्यात आली आहे अशा सर्व संशोधक मार्गदर्शकांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासह संशोधन केंद्र असणा–या संशोधन केंद्रास संलग्नित होणे अनिवार्य राहिल. संबंधित संशोधक मार्गदर्शक पदव्युत्तर अभ्यासक्रमासह संशोधन केंद्रास संलग्नित झाले नाहीत तर त्यांना नविन संशोधक विद्यार्थी वितरित करण्यात येणार नाहीत.

सहा. कुलसचिव
पदव्युत्तर विभाग

प्रत

१. मा. प्राचार्य तथा संशोधन केंद्र प्रमुख संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. संचालक तथा संशोधन केंद्र प्रमुख सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. उपकेंद्र संचालक विद्यापीठ उपकेंद्र लातूर, परभणी